# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा
## मराठी विभाग
## अहवाल- २०२१-२२

शैक्षणिक सत्र २०२१-२२ हे कोरोना-१९ या साथीच्या रोगाने ग्रस्त असल्यामुळे स.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार दि. ३०/०८/२०२१ पासून महाविद्यालयात प्रवेश देणे आणि वरिष्ट वर्गाला शिकविणे सुरु झाले.

नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी मराठी विभागांतर्गत **Induction programme** चे दि. ०९/०९/२०२१ ला विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अभ्यासक्रमाविषयी, अंतर्गत मूल्यमापन संदर्भात, विद्यापीठाच्या परीक्षेविषयी आणि वांड;मय आकलना संदर्भात विद्यार्थ्यांना इत्यंभूत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर सर, प्रमुख मार्गदर्शक प्रा. रवींद्र खंडेराव (मराठी विभाग प्रमुख) आणि डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.

दि. ०६/१२/२०२१ ला विभागाच्या वतीने "९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या वृत्तपत्रीय बातम्यांचा कात्रण प्रकल्प" डॉ. गारोडे यांच्या मार्गदर्शनात ०९ विध्यार्थ्यांनी सादर केला.

दि. ०१/०४/२०२२ ते दि. १५/०४/२०२२ पर्यंत "प्रसार माध्यमाकरिता लेखन कौशल्य" या विषयावर प्रमाणपत्र कोर्स **(certificate course)** घेण्यात आला.

मराठी विभागाने दि. १० जानेवारी २०२२ ला महाविद्यालयात शासनाच्या आदेशान्वये "मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा" निमित्त विध्यार्थ्यांचे कवी संम्मेलन आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर सर, प्रमुख मार्गदर्शक प्रा. रवींद्र खंडेराव (मराठी विभाग प्रमुख) आणि डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.

दि. ०३ जानेवारी २०२२ ला विभागाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त "महिला सक्षमीकरण" या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर सर, प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे आणि प्रा. रवींद्र खंडेराव यांच्या मार्गदर्शनात तसेच प्रा. डॉ. प्रमोद गारोडे , प्रा. गणेश दांडगे, प्रा. नवले, प्रा. कु. सदांशीव यांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

दि. २८ फेब्रुवारी २०२२ सोमवारला कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त "मराठी भाषा गौरव दिनाचे" आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमेकर सर, प्रमुख मार्गदर्शक प्रा. रवींद्र खंडेराव (मराठी विभाग प्रमुख) आणि डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.

या कार्यक्रमाकरिता प्रा. गणेश दांडगे, प्रा. नवले, प्रा. कु. सदांशीव यांच्या सहकार्य लाभले आणि कार्यक्रमाकरिता बहुसंख्य विध्यार्थी उपस्थित होते.

मराठी विभाग प्रमुख